वरिष्ठ वैज्ञानिक सहायक या पदावरुन "उपमृद सर्वेक्षण अधिकारी/मृद शास्त्रज्ञ (गट-ब)" या पदावर <u>तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्याबाबत.</u>

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन आदेश क्रमांक एसएलएस २०१४/(१९/२०१४)/आ(वर्ग-२)
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : १६ मार्च, २०१८

<u>वाचा</u> :- १) शासन आदेश, समक्रमांक, दिनांक ४.९.२०१५
२) शासन आदेश, समक्रमांक, दिनांक १५.१२.२०१५
३) शासन आदेश, समक्रमांक, दिनांक ११.७.२०१७

पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे येथील खालील विवरणपत्रात दर्शविण्यात आलेले वरिष्ठ वैज्ञानिक सहायक यांना **"उपमृद सर्वेक्षण अधिकारी/मृद शास्त्रज्ञ (गट-ब)"** या पदावर रुपये ९३००-३४८०० (ग्रेड वेतन ४८००) या वेतनश्रेणीत खाली नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून अत्यंत तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यांत येत असून, त्यांची पदोन्नतीनंतर खालील रकाना क्रमांक ५ मध्ये दर्शविल्यानुसार सविस्तर पदस्थापना करण्यात येत आहे. सदर पदोन्नती ११ महिन्यांसाठी किंवा **दिनांक १५ फेब्रुवारी, २०१९ (म.नं.)** पर्यंत यापैकी जे प्रथम घडेल तोपर्यंत देण्यात येत आहे. तद्नंतर सदर पदोन्नती आपोआप संपुष्टात येईल.

अ. क्र.	वरिष्ठ वैज्ञानिक सहायकाचे नाव व प्रवर्ग	मागणी केलेला विभागीय संवर्ग	नियमानुसार वाटप करण्यात येत असलेला विभागीय संवर्ग	उपमृद सर्वेक्षण अधिकारी (गट-ब) पदावरील पदोन्नतीनंतर नियुक्तीचे कार्यालय
१	२	३	४	५
१	श्री.फैयाजोद्दीन कमोरोद्दीन शेख (वि.जा.-अ) - खुला प्रवर्ग	औरंगाबाद	औरंगाबाद	अधीक्षक अभियंता व संचालक, पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे अंतर्गत औरंगाबाद विभागात रिक्त पदी
२	श्री.संजय पंढरीनाथ मून (अ.जा.)- खुला प्रवर्ग	नागपूर	नागपूर	अधीक्षक अभियंता व संचालक, पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे अंतर्गत नागपूर विभागात रिक्त पदी

२. "महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसुली विभाग वाटप नियम, २०१५" दिनांक २८.४.२०१५, दिनांक १६.७.२०१५ व १५.६.२०१७ मधील तरतुदीनुसार पदोन्नत वरिष्ठ वैज्ञानिक सहायक यांना रिक्त पदांच्या मर्यादेत विभागीय संवर्गाचे वाटप दर्शविण्यात आलेले आहे. पदोन्नत वरिष्ठ वैज्ञानिक सहायक यांना सविस्तर पदस्थापना देण्याचे अधिकार संबंधित अधीक्षक

अभियंता यांना देण्यात येत आहेत. अधीक्षक अभियंता व संचालक, पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे यांनी पदोन्नत वरिष्ठ वैज्ञानिक सहायक यांची पदस्थापना त्यांना वाटप करण्यात आलेल्या विभागातच करण्याबाबतची दक्षता घ्यावी व उपमृद सर्वेक्षण अधिकारी पदावरील सविस्तर पदस्थापनेचे आदेश, हे शासन आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून कार्यालयीन कामकाजाच्या ७ दिवसांच्या आत निर्गमित करणे बंधनकारक आहे. उपमृद सर्वेक्षण अधिकारी पदावरील सविस्तर पदस्थापनेचे प्राप्त झाल्यानंतर पदोन्नत झालेल्या वरिष्ठ वैज्ञानिक सहायक यांना तात्काळ दिनांक २६.०३.२०१८ पर्यंत कार्यमुक्त करावे व त्याबाबतचा अहवाल शासनास तात्काळ सादर करावा.

३. उपरोक्त वरिष्ठ वैज्ञानिक सहायक यांनी पदोन्नतीनंतर नियुक्तीच्या ठिकाणी तात्काळ एक महिन्याच्या आत रुजू व्हावे. तसेच, **उपमृद सर्वेक्षण अधिकारी/मृद शास्त्रज्ञ** या पदाचा कार्यभार ग्रहण केल्याचा दिनांक शासनास तात्काळ कळवावा. पदोन्नतीवरील नियुक्तीच्या ठिकाणी एक महिन्यांचे आत हजर झाले नाहीत, तर ते पदोन्नतीस इच्छुक नाहीत असे गृहीत धरुन त्यांना दिलेली पदोन्नती रद्द करण्यात येईल. उपमृद सर्वेक्षण अधिकारी पदावर देण्यात आलेली पदोन्नती, सध्या जरी तात्पुरत्या / अभावित असली तरी कालांतराने ती नियमित होत असल्याने जे वरिष्ठ वैज्ञानिक सहायक पदोन्नती नाकारतील त्यांचेबाबतीत सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १२.०९.२०१६ च्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल. पदोन्नत वरिष्ठ वैज्ञानिक सहायकाने पदोन्नती नाकारली नसेल व ते पदोन्नतीच्या पदावर होत नसल्यास त्यांचे दि.०१.०३.२०१८ पासूनचे वेतन काढण्यात येऊ नये. याबाबतची जबाबदारी अधीक्षक अभियंता व संचालक, पाटबंधारे संशोधन विकास संचालनालय, पुणे यांची राहील.

४. पदोन्नत वरिष्ठ वैज्ञानिक सहायक यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील नियम ८ व १० खाली विभागीय चौकशी चालू अथवा प्रस्तावित नसल्याच्या अटीच्या अधीन राहून, सदर पदोन्नती करण्यात येत आहे. तथापि, जर त्यांचेविरुध्द या आदेशाच्या दिनांकास विभागीय चौकशी चालू अथवा प्रस्तावित असेल, तर त्यांच्या बाबतीत हे पदोन्नती आदेश आपोआप रद्द होतील.

५. सदर तदर्थ पदोन्नती मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या अधीन राहून पदोन्नतीच्या कोटयातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात करण्यात येत आहे.

६. सदर पदोन्नती मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील रिट पिटीशन क्रमांक ८४५२/२००४ च्या निकालाच्या अंतिम निर्णयाच्या व मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांच्याकडे दाखल करण्यात आलेल्या मूळ अर्ज क्रमांक १२०९/२०१० च्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहील. तसेच सदर पदोन्नती श्री. आर.के.सबरवाल विरुध्द पंजाब सरकार, या प्रकरणी शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार होत असलेल्या पुनर्विलोकनाच्या अधीन राहील.

७. सदरची पदोन्नती संबंधितांच्या वयाच्या ५०-५५ व्या वर्षी करण्यांत येणाऱ्या पुनर्विलोकनाच्या अधीन राहून देण्यांत येत आहे.

८. सदर पदोन्नती ही तात्पुरती असून, वरिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक संवर्गातील प्रसिध्द करण्यात आलेल्या अंतिम ज्येष्ठतासूचीच्या अधीन राहून देण्यात येत आहे. त्यामुळे, वरिष्ठ वैज्ञानिक सहायक यांना देण्यात आलेल्या अभावित व तात्पुरत्या स्वरुपातील पदोन्नतीमुळे त्यांना नियमित पदोन्नतीचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत.

९. या आदेशान्वये, उपरोक्त वरिष्ठ वैज्ञानिक सहायक यांनी शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : पीएवाय-१०८२/सीआर/११००/(एक)/एसईआर/३, दिनांक ६.११.१९८४ नुसार वेतननिश्चिती संबंधीचा आपला विकल्प पदोन्नतीच्या दिनांकापासून एक महिन्यांचे आत द्यावा व असा विकल्प न दिल्यास, त्यांची वेतननिश्चिती म.ना.से.(वेतन) नियम १९८१ मधील नियम ११ (१) (ए) खाली करण्यात येईल.

१०. उपमृद सर्वेक्षण अधिकारी पदावर पदोन्नती झालेल्या वरिष्ठ वैज्ञानिक सहायक यांनी दिनांक ३१.०३.२०१७ अखेरचे मत्ता व दायित्व विवरण संबंधित कार्यालयास सादर केले असल्याची खात्री अधीक्षक अभियंता व संचालक, पाटबंधारे संशोधन विकास संचालनालय, पुणे यांनी करावी.

११. हे आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक २०१८०३१६१६३१०४४४२७ असा आहे. तसेच हे आदेश जलसंपदा विभागाच्या www.wrd.maharashtra.gov.in या सकेतस्थळावर उपलब्ध आहेत. त्यावरुन हे आदेश डाऊनलोड करुन अधीक्षक अभियंता व संचालक, पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे यांनी पुढील कार्यवाही तात्काळ करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Vinayak Vishwanath Lawate

Digitally signed by Vinayak Vishwanath Lawate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=eb6e5bc7ae10ae9ecaa376fe734f5ee18589f6a42c0c82108b047be5703d1af3, serialNumber=81fd2869906a1aeee21da3e5d509f89daa03571d84025e4321bc9f87546c02a1, cn=Vinayak Vishwanath Lawate
Date: 2018.03.17 14:40:31 +05'30'

(विनायक लवटे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन १२ व १६-ब), मंत्रालय, मुंबई,
२. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राव्दारे),
३. प्रधान सचिव (जलसंपदा)/सचिव (ला.क्षे.वि.),जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. अधीक्षक अभियंता व संचालक, पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे
   संबंधीत वरिष्ठ वैज्ञानिक सहायक यांना अधीक्षक अभियंता व संचालक, पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे या कार्यालयामार्फत रवाना.
५. आ (तांत्रिक)/आ (संनि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. आ (वर्ग-२) कार्यासन, संग्रहार्थ.